प्रेस नोट

दिनांक:- १०.०१.२०१७

दिनांक. ०९.०१.२०१७ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. कैलास नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनि रंजीतसिंह ठाकूर , पोहेकॉ प्रमोद डोईफोडे, पोशि अमित दुबे , संदीप काटकर यांनी गुप्त माहितीवरुन पोस्टे खदान हद्दीत कौलखेड चौक येथील स्वामी स्विटमार्ट दुकानासमोर चालत असलेल्या जुगार अड्डयावर रेड केली असता आरोपी नामे १) रामा किसन सोनवणे २) सचिन दादाराव गावंडे यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून मिलन वरली मटका जुगाराच्या सट्टापटी, पेन व नगदी ६७४५/- रूपये तसेच दोन मोबाईल फोन किंमत १४००/- रूपये असा एकूण ८१४५/- रूपयांचा माल जप्त करून त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ अ प्रमाणे पोस्टे खदान येथे गून्हा दाखल करण्यात आला आहे.

( के. एच. शेळके )
सहा. पोलीस निरीक्षक तथा
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला
मो.नं. ९४२२९५८६१५

प्रति,

संपादक , दैनिक --------

कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रापमध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

प्रेस नोट

दिनांक:- १०.०१.२०१७

आज दिनांक. १०.०१.२०१७ रोजी अपर पोलीस अधीक्षक श्री. विजयकांत सागर, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. उमेश माने पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. कैलास नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उपनि रणजीतसिंह ठाकूर, पोहेकॉ पोहेकॉ प्रमोद डोईफोडे, पोशि अमित दुबे , संदीप काटकर यांनी अन्न व औषधी प्रशासन येथील अधिकारी श्री. नितिन नवलकर यांना माहिती देवून गुप्त माहितीवरून गुटखा तयार करून विकणारे नामे जितेंद्र राजकुमार गुरुनानी रा. सिंधी कॅम्प अकोला यांच्या घरावर छापा मारला असता सदर घरामधून १) १० किलो गुटखा किंमत ३०००/- २) १३० किलो सुपारी किंमत ३२,५००/- ३) ३ किलो तंबाकू किंमत १८०/- ४) १० किलो चुना किंमत १००/- ५) २ नग गुटखा तयार करण्याच्या मशीन किंमत २०,०००/- असा एकूण ५५,७५० रुपयांचा माल जप्त करून पुढील कारवाई करणेकामी अन्न व औषधी प्रशासन यांच्या ताब्यात सदरचा मुद्देमाल देण्यात आला आहे.

( के. एव. शेळके )
सहा. पोलीस निरीक्षक तथा
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला
मो.नं. ९४२२९५८६१५

प्रति,

संपादक , दैनिक --------

कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रापमध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.